**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

वर्तकनगर प्रभाग समिती,
दिनांक :-३१/०५/२०१०

**मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा**
**सभा सुचना क्र. ०३ दिनांक ३१/०५/२०१०**
**सभा क्रमांक ०३ दिनांक ०५/०६/२०१०**

**सन्मा. श्री. /श्रीमती --------------------------------------**

सदस्य / सदस्या - वर्तकनगर प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा **शनिवार दिनांक ०५/०६/२०१० रोजी सकाळी ११.३० वा.** वर्तकनगर प्रभाग समिती कार्यालय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह, २ रा मजला, येथे सभा सुचना क्र. ०३ दिनांक ३१/०५/२०१० च्या सोबतच्या विषय पत्रिकेवरील विषयावर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यात आली आहे.

कृपया सदर सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

मा. अध्यक्ष महोदय यांचे आदेशानव्ये.

सही/-
**प्रभाग अधिकारी**
वर्तकनगर प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**सभा सुचना क्रमांक ०३ दिनांक ३१/०५/२०१० ची विषय पत्रिका.**

**प्रकरण क्रमांक** **विषय**

९ ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सन २०१० - ११ साठी अध्यक्ष निवडीची सभा क्र. ०१ दिनांक ०३/०४/२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

१० ठाणे महानगरपालिकेच्या वर्तकनगर प्रभाग समितीची सभा क्र. ०२ दिनांक २१/०४/२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

सही/-
**प्रभाग अधिकारी**
वर्तकनगर प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. वर्तकनगर प्रभााग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक ३१/०५/२०१०

**सोबत :-** १) मा. वर्तकनगर प्रभाग समितीची अध्यक्ष निवडीची सभा क्र. ०१ दिनांक ०३/०४/२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त.
२) सभा क्र. ०२ दिनांक २१/०४/२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त.

**<u>ठाणे महानगरपालिका, ठाणे</u>**

वर्तकनगर प्रभाग समिती,
दिनांक :- ०५/०६/२०१०

**<u>मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा</u>**
**<u>सभा सुचना क्र. ०३ दिनांक ३१/०५/२०१०</u>**
**<u>सभा क्रमांक ०३ दिनांक ०५/०६/२०१०</u>**

**सन्मा. श्री. /श्रीमती ------------------------------------**

सदस्य/सदस्या - वर्तकनगर प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा शनिवार दिनांक ०५/०६/२०१० रोजी सकाळी ११.३० वा. वर्तकनगर प्रभाग समिती कार्यालय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह, २ रा मजला, येथे सभा सुचना क्र. ०३ दि. ३१/०५/२०१० रोजीच्या विषय पत्रिकेवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

**<u>सदर सभेस उपस्थित असलेले सदस्य :-</u>**

| | | |
|---|---|---|
| **१)** | **सन्मा. श्री. हरीश्चंद्र श्रीपत पाटील** | **अध्यक्ष** |
| २) | सन्मा. श्री. रामभाऊ लहु फडतरे | सदस्य |
| ३) | सन्मा. सौ. ताई मारुती भोंडवे | सदस्या |
| ४) | सन्मा. श्री. दिनेश मनोहर पाथरे | सदस्य |
| ५) | सन्मा. सौ. अनिता अशोक सावंत | सदस्या |
| ६) | सन्मा. श्री. नागसेन गंगाराम इंदिसे | सदस्य |
| ७) | सन्मा. सौ. वनिताताई गंगाराम इंदिसे | सदस्या |
| ८) | सन्मा. श्री. सुरेश दाजी भोईर | सदस्य |
| ९) | सन्मा. श्री. दशरथ बाबुराव पालांडे | सदस्य |
| १०) | सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले | सदस्य |
| ११) | सन्मा. श्री. संतोष हरिश्चंद्र मोरे | स्वि. सदस्य |
| १२) | सन्मा. श्री. संजय तुकाराम कदम | स्वि. सदस्य |

**<u>सदर सभेस अनुपस्थित असलेले सदस्य :-</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | सन्मा. श्रीमती. छाया मनोहर राव | सदस्या |
| २) | सन्मा. श्री. सुधाकर वामन चव्हाण | सदस्य |
| ३) | सन्मा. सौ. परिषा प्रताप सरनाईक | सदस्या |
| ४) | सन्मा. श्री. सुधीर प्रल्हाद बर्गे | सदस्य |
| ५) | सन्मा. कु. योगिता रमेश वैती | सदस्या |
| ६) | सन्मा. श्री. सुनिल आबाजी शिंदे | स्वि. सदस्य |

**प्रभाग अधिकारी श्री. बाबासाहेब आंधळे मा. अध्यक्ष सो. यांचे परवानगीने सभा क्र. ३ चा अजेंडा वाचून सभेला सुरुवात करतात.**

**प्रभाग अधिकारी विषय पत्रिकेवरील विषय क्र. ९ , १ ० वाचून दाखवितात.**

**सर्वानुमते मंजुर**

**मा. अध्यक्ष महोदय :-**

या आजच्या सभेपुढे आयत्यावेळी आलेले विषय मंजुरीसाठी घेण्यात यावेत.

**प्रभाग अधिकारी मा. अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्यावेळी आलेला विषय क्र. १ १ वाचून दाखवितात.**

**सर्वानुमते मंजुर**

**मा. अध्यक्ष महोदय :-**

आजच्या या सभेला सुरुवात करण्यापूर्वी नव्याने निवडून आलेले नवनिर्वाचित सदस्य श्री. सुरेश दाजी भोईर या ठिकाणी आलेले आहेत. त्यांचे मी प्रथम अभिनंदन व स्वागत करतो. नालेसफाईचा मोठा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. नाले सफाईवाल्यांनी प्रभाग समितीअंतर्गत असलेल्या प्रभागनिहाय नालेसफाईबाबत माहिती द्यावी. तत्पुर्वी आपण पुढच्या आठवडयामध्ये नालेसफाईबाबत पाहणी दौरा आयोजित करु. पाहणी दौरा निश्चित करुन संपूर्ण प्रभागनिहाय नालेसफाईची पाहणी करु. याबाबत संबंधित अधिका-यांनी नियोजन करुन दौ-याची रुपरेषा निश्चित करावी. यावर्षी नालेसफाईबाबत आजिबात तडजोड करण्यात येणार नाही. सदर दौ-याचेवेळी मा. आयुक्त साहेबांनाही बरोबर घेण्याचा प्रयत्न करु या. माझ्या प्रभागातील नालेसफाईची पाहणी केली आहे. प्रभाग समिती अध्यक्ष या नात्याने आपण संपूर्ण प्रभाग समितीतील नाल्यांचा पाहणी दौरा करु.

आपल्या समितीचे कार्यकारी अभियंता श्री. भिरुड हे दिर्घ रजेवर असल्याने त्यांचा कार्यभार माजिवडा प्रभाग समितीचे कार्यकारी अभियंता श्री. कोल्हे यांचेकडे सोपविण्यात आला आहे. यापूर्वीही त्यांचेकडेच कार्यभार सोपविण्यता आला होता. परंतु त्यावेळी ते पुरेसा वेळ या समितीसाठी देवू शकले नाही. ते याठिकाणी आलेले आहेत. त्यांना या समितीसाठी पुरेसा वेळा द्यावा लागणार आहे. शक्य नसल्यास त्यांनी आम्हाला याठिकाणी तसे सांगावे. आम्ही दुस-या अधिका-याच्या नावाची शिफारस करु. श्री. कोल्हे हे देखील मेहनती आहेत. हुशार आहेत. कर्तव्यदक्ष आहेत. पण आम्हाला जास्तीत जास्त वेळ देणारा अधिकारी हवा आहे. दोन दोन समित्यांचा कार्यभार सांभाळावा लागणार असल्याने त्यांना शक्य होते की नाही ते बघू.

मे महिन्यांमध्ये काही अधिकारी व सन्मा. सदस्य हे बाहेरगावी असल्याने त्या महिन्यामध्ये बैठक लावता आली नाही. त्यामुळे ही सभा जुन महिन्याच्या पहिल्याच आठवडयात घेतली आहे. या सभेमध्ये मी आरोग्य विभागाचे उप मुख्य स्वच्छता निरिक्षक श्री. दिपक आहिरे यांचे अभिनंदन करतो ! कारण त्यांना केव्हाही फोन केला तर ते तातडीने हजर असतात. केव्हाही काम सांगितले तरी ते नाही म्हणत नाहीत. अशा कर्तव्य दक्ष अधिका-याचा महापालिकेनेही सत्कार करायला पाहिजे. मी देखील त्यांचा या ठिकाणी सत्कार करणार आहे.

**सन्मा. सदस्या सौ. वनितताई इंदिसे** :-

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागातील इमारत क्र. ५४ जवळील पाईपलाईनबाबत पत्र दिले होते. तसेच प्रभागाच्या सिमेवर एक मस्जिद आहे ती कोणत्या प्रभागात येते ते समजत नाही. त्याठिकाणी काम करण्यास अडचण येत आहे.

**श्री. कैलास मुंबईकर** (कार्य. अभियंता) :-

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्या सौ. वनितताई इंदिसे यांनी दिलेल्या पत्रानुसार आम्ही त्याबाबत पाठपुरावा करत आहोत. म्हाडाच्या कार्यालयात देखील जाऊन आलो आहे. एक दोन दिवसांत त्याठिकाणी दोन इंची जलवाहिनी टाकण्याचे काम चालु होणार आहे.

**मा. अध्यक्ष महोदय** :-

ती मस्जिद कोणत्या वॉर्डात येते हे आपण नंतर बघू. त्याठिकाणी काही काम करायचे असल्यास आपण संबंधित अधिका-यांना बोलवून चर्चा करुन काम करुन घेवू.

**श्री. दिपक आहिरे** (उ.मु.स्व. निरीक्षक) :-

मा. अध्यक्ष महोदय, नाले सफाईबाबत माझेकडे उपलब्ध माहिती मी देतो, वर्तकनगर प्रभाग समिती कार्यक्षेत्रामध्ये एकूण १९ कि. मी. लांबीचे नाले आहेत. त्यापैकी एकूण १६ कि. मी. लांबीच्या नाल्यांची साफसफाई झालेली आहे. उर्वरीत ठिकाणी काही अडचणी येत असल्याने तेथील कामही लवकरच पूर्ण करण्यात येईल.

**मा. अध्यक्ष महोदय** :-

कुठलेही काम करण्यापूर्वी सन्मा. सदस्यांना त्याबाबत सुचित करण्यता यावे. जेणेकरुन त्यांच्या मदतीने चांगल्यारीतीने काम करता येईल. यापूर्वीही सर्व अधिका-यांना याबाबत सुचना केलेल्या आहेत.

**श्री. दिपक आहिरे** (उ.मु.स्व. निरीक्षक) :-

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्य श्री. रामभाऊ फडतरे यांचे वॉर्डातील काम बाकी आहे. तसेच जयभवानी नगर येथील नाल्याजवळ खोदकाम करावे लागणार आहे. तीन चार दिवसांमध्ये काम पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**सन्मा. सदस्य श्री. दशरथ पालांडे** :-

मा. अध्यक्ष महोदय, काही ठिकाणी नाल्यावरील चेंबर्सवर अतिक्रमणे झालेली आहेत. ते लोक नाला साफ करु देत नाहीत. नाल्यामध्ये माती पडलेली आहे. हक्काची जागा असल्यासारखे ते लोक वावरतात व नालेसफाईत अडचणी आणतात.

**मा. अध्यक्ष महोदय** :-

ज्या ज्या ठिकाणी अशी परिस्थती असेल किंवा जेथे जेथे नाल्यावर अतिक्रमणे झालेली आहेत. ती अतिक्रमणे ताबडतोब हटविण्यात यावीत.

**सन्मा. सदस्य श्री. दशरथ पालांडे** :-

मा. अध्यक्ष महोदय, आपले अधिकारी कारवाईसाठी पोलिस नसल्याची सबब सांगत होते. आता महापालिकेने करोडो रुपयांची तरतुद पोलिसांसाठी करुन दिली आहे. खाजगी जागेवर अतिक्रमण असेल तरच नोटीस दिली जाते. असे असतांना नाल्यावरील व फुटपाथवरील अतिक्रमणांवर कारवाईसाठी नोटीसा लावण्याची आवश्यकताच नाही.

**मा. अध्यक्ष महोदय** :-

अतिक्रमणांवर कारवाई करतांना अनेकवेळा अतिक्रमणवाला सन्मा. सदस्यांची नावे सांगतात. माझेही नाव कुठेतरी वापरले गेले असल्याबाबत मला समजले आहे. परंतु मी याठिकाणी सर्व अधिका-यांना सुचना करतो की, अशा प्रकारे गैर कामासाठी माझ्या नावाचा वापर करत असेल तर अशी अतिक्रमणे प्राधान्याने तोडा. कारण मी व माझे सर्व सन्मा. सदस्य कोणत्याही अतिक्रमणाला किंवा अनधिकृत कामाला प्रोत्साहन देत नाही. किंवा त्यांना मदत करत नाही. वर्तकनगर प्रभाग समितीला सहा. आयुक्त हे सक्षम अधिकारी आहेत. अशा बांधकामांना नोटीसा न देता कारवाई करण्यात यावी.

**सन्मा. सदस्य श्री. दशरथ पालांडे** :-

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्य श्री. रामभाऊ फडतरे यांनी यापूर्वी दोन तीन वेळा हा विषय मांडलेला आहे. गेल्यावेळीही हाच विषय उपस्थित केला होता. प्रत्यक्षात कारवाई होत नाही. नाल्यांवरील अतिक्रमणे काढल्याशिवाय नालेसफाई होणार नाही.

**मा. अध्यक्ष महोदय** :-

नाल्यांवरील अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करण्यात यावी. कारवाई करुन त्याबाबत खुलासा कळवावा. एम.आर.टी.पी. दाखल करा.

**श्री. मंगल शिंदे** (सहा. आयुक्त) :-

मा. अध्यक्ष महोदय, ज्याठिकाणी तीन चार वर्षापूर्वीची अतिक्रमणे आहेत तेथे कारवाईत अडथळा येतो. तरीही प्रयत्न करतो. पुढच्या आठवडयात कारवाई घेतो.

**सन्मा. सदस्य श्री. रामभाऊ फडतरे** :-

मा. अध्यक्ष महोदय, त्याठिकाणी ब्रिजचे काम होणार आहे. त्यानंतर मोठया प्रमाणावर वाहतुक या मार्गाने सुरु होणार आहे.

**सन्मा. सदस्य श्री. दशरथ पालांडे** :-

मा. अध्यक्ष महोदय, फुटपाथवर अतिक्रमणे झाल्यानंतर चेंबरमधून नाले सफाई करता येत नाही. काही लोक त्याठिकाणी हक्क सांगत आहेत. नालेसफाईस त्रास होत आहे. कामगार हॉस्पिटलजवळ जाऊन बघा काय परिस्थिती आहे. त्याठिकाणी असलेल्या स्वच्छता निरिक्षकांना विचारा काम पूर्ण होत नाही. आपतकालीन कक्षाबाबत मला आलेला अनुभव आहे. कोणीही त्याठिकाणी उपस्थित नसतो. सकाळी ८ वा. मी तिथे भेट दिली होती. यावेळी संबंधित कर्मचा-यांची नावे त्यांचे मोबाईलनंबर आम्हाला देण्यात यावे. आम्ही वेळोवेळी तपासणी करु. पुन्हा असा विषय उपस्थित होणार नाही व पावसाळयात यापूर्वी जिथे जिथे नाले भरतात तेथे पुन्हा तीच परिस्थिती होणार नाही , याबाबत काळजी घेण्यात यावी. आपतकालीनचा फोन केला तर फोन कोणीही उचलत नाही.

**श्री. मंगल शिंदे** (सहा. आयुक्त) :-

यावर्षी आपण एक पुस्तिका तयार केली आहे. त्यामध्ये आपतकालीन कक्षातील कर्मचा-यांची संपूर्ण माहिती दिलेली आहे. २४ तास आपातकालीन कक्ष कार्यरत राहिल अशा पध्दतीने कर्मचा-यांची डयुटी लावलेल्या आहेत. त्याची प्रत सर्वांना माहितीसाठी देण्यात येइल.

**सन्मा. सदस्य श्री. दशरथ पालांडे** :-

मा. अध्यक्ष महोदय, मा. महासभेमध्ये गेल्यावर्षी हा प्रश्न उपस्थित केला होता. कारवाई करतात पण पुन्हा तीच परिस्थिती निर्माण होते. कारवाईच्या दुस-या दिवशी परिस्थिती जैसे थे !

**सन्मा. सदस्य श्री.संतोष मोरे** :-

मा. अध्यक्ष महोदय, शिवसेनाशाखेजवळील व्होल्टास कंपनीलगत रस्त्यावरुन नाल्याचे पाणी वाहते. एका बांधकाम व्यावसायिकाने नाल्यावरील जागेवर कंपाऊंड करुन आतल्याबाजूने काम करत आहे. त्यामुळे नाल्यातील पाणी वरुन वाहत आहे. आपले स्वच्छता निरीक्षक श्री. दळवी यांनी त्याठिकाणी पाहणी केली आहे.

**श्री. नितिन दळवी** (स्व.निरीक्षक) :-

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्यांनी सागितलेल्या ठिकाणी मी पाहणी केली आहे. ती जागा व्होल्टास कंपनीची आहे. त्यांचे जागेवर कंपाऊंड केलेले आहे. त्यामुळे नाल्यात पोकलेन मशिन उतरवता येत नाही.

**मा. अध्यक्ष महोदय** :-

नालेसफाईत अडचण येत असेल तर त्याला नोटीस लावा. शहर विकास विभागाकडून अभिप्राय घ्या. नोटीसची प्रत मला उपलब्ध करुन द्या. मी माझे स्तरावर पाठपुरावा करतो.

**सन्मा. सदस्य श्री. सुरेश भोईर** :-

मा. अध्यक्ष महोदय, हरीदासनगर जवळ सुमारे ५०० कुटुंबांची वस्ती आहे. परंतु त्याठिकाणी आऊटलेट नाही. जो आऊटलेट आहे त्याला स्लोप नाही. पावसाळयामध्ये पाणी वाहून जात नाही. त्याठिकाणी वेळोवेळी साफसफाई झाली पाहिजे.

**श्री. नितिन दळवी** (स्व. निरीक्षक) :-

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्यांनी सांगितलेल्या ठिकाणी असलेली गटारे वरच्या भागावर आहेत. काही प्रमाणात पाणी जाते.

**श्री. महेश अमृतकर** (उप अभियंता) :-

मा. अध्यक्ष महोदय, त्याठिकाणी मुख्य रस्त्याचे कल्व्हर्ट वरच्या भागावर असल्याने पाण्याचा निचरा होत नाही. काही प्रमाणात काम केले आहे. काही प्रमाणात स्लोप कमी झालेला आहे. दैनंदिन साफसफाईने पाण्याचा निचरा होईल.

**सन्मा. सदस्य श्री. संजय कदम** :-

मा. अध्यक्ष महोदय, कोरम मॉलजवळील वाहतुक कोंडीबाबत सहा. आयुक्तांना पत्र दिले आहे. काय कारवाई केली ?

**मा. अध्यक्ष महोदय** :-

सन्मा. सदस्यांनी फार महत्वाचा विषय उपस्थित केला आहे. याच ठिकाणी आग लागली होती. मा. आ. श्री. प्रताप सरनाईक यांचेबरोबर मी देखील पाहणी केली आहे. आपल्या अधिका-यांनी चांगले काम केले आहे. आपण नेहमीच अधिका-यांना दोष देत असतो. परंतु त्यांनी चांगले काम केले तर त्यांचे अभिनंदन देखील केले पाहिजे. सर्वच अधिकारी त्यावेळी उपस्थित होते. कोरम मॉल वाल्यांनी त्याठिकाणी थर्माकोलचे तुकडे नाल्यात टाकले होते. नाला बुजवून त्यावर गार्डन केले आहे. सहा आयुक्तंनी तातडीने जेसी.बी. व पोकलेन मशिन लावून नाला साफ केला पाहिजे. गार्डन मधून देखील धूर निघत होता. अशावेळी कर्मचा-यांना पुढे करुन त्यांचा जीवा धोक्यात घालू नका. कोणतेही चेंबर उघडले तरी त्यातून धूर येत होता. अधिका-यांनी सदरचा नाला मोकळा करावा. त्यांनी फुटपाथ बळकावले आहेत. ते मोकळे करावेत.

**श्री. मंगल शिंदे** (सहा. आयुक्त) :-

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्य श्री. संजय कदम यांनी पत्र दिले आहे. याबाबत कोरम मॉलच्या हलगर्जीपणाबद्दल मा. महापौरांनी देखील भेट दिली आहे. अनधिकृत वाहन पार्किंगबाबत वाहतुक शाखेकडे पत्र दिले आहे. आपल्याकडे पुरेसे पथक नाही. आपल्याकडे फक्त जॅमर आहे. त्याच्याने प्रभावी कारवाई होणार नाही. सर्वच प्रभाग समित्यांना स्वतंत्र वाहन उपलब्ध करुन देणेबाबत बैठक घेतलेली आहे. सदरची बाब खर्चिक आहे. याबाबत सुचना दिलेल्या आहेत. त्याचा पाठपुरावा चालू आहे. वाहनतळ तयार करणेबाबत विचार चालू आहे.

**मा. अध्यक्ष महोदय** :-

आताच सहा. आयुक्त यांनी सांगितले की, सदरची बाब खर्चिक आहे, त्याठिकाणी कर्मचा-यांची जिवितहानी झाल्यानंतर कारवाई करणार का ? तोपर्यंत वाट बघणार का ? ताताडीने कारवाई करा, नोटीसा देवू नका. मा. आयुक्त साहेबांना भेटून त्यावर कारवाई करा.

**श्री. मंगल शिंदे** (सहा. आयुक्त) :-

मा. अध्यक्ष महोदय, कोरम मॉलने नाल्याबाबत काही परवानगी घेतली आहे काय ! याबाबत विचारणा करुन कागदपत्रांची मागणी केली आहे. वरीष्ठ स्तरावर कारवाई चालू आहे.

**मा. अध्यक्ष महोदय** :-

मी स्वतः तुमच्या बरोबर येतो. त्यांनी नाल्यावर स्लॅब टाकलेला आहे. पत्रे लावलेले आहेत. त्यांचेवर कारवाई झाली पाहिजे. मी तुम्हाला पत्र दिलेले आहे. तुम्हाला माहिती दिलेली आहे. तसेच सिनेवंडर बाबत माहिती मागविली होती. अद्याप मला माहिती दिलेली नाही. सोमवारी आपण त्याठिकाणी भेट देणार आहे. आपण संबंधित अधिका-यांना याबाबत सुचना द्या. सहा. आयुक्तांनी याबाबत लक्ष घातले पाहिजे. त्यांनी अनधिकृतपणे अंतर्गत बांधकाम केले आहे. त्यांचेवरही कारवाई झाली पाहिजे. महापालिकेच्या पदाधिका-यांचा आदर केला पाहिजे हे त्या लोकांना समजले पाहिजे.

याठिकाणी आपण बैठक थोडी थाबवून नवनिर्वाचित सदस्य श्री. सुरेश दाजी भोईर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार समारंभ करु या.

**(मा. अध्यक्ष महोदय नवनिर्वचित सदस्य श्री. सुरेश भोईर चांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करतात.)**

नालेसफाईबाबत आपण पाहणी दौरा आयोजित केला आहे. चार्ट तयार करा त्यानुसार पाहणी दौरा करण्यात येईल. याबाबत सर्व सन्मा. सदस्यांनी संपर्कात रहावे. नालेसफाईबाबत चर्चा करता यावी म्हणून आपण जुन महिन्यात बैठक घेतलेली आहे. याबाबत सर्व अधिका-यांना सुचना दिलेल्या आहेत. नविन ठेकेदाराने काम चालू केले आहे. त्याने मशिनरी लावून नाले सफाई केली आहे. अधिका-यांना बरोबर घेवून काम करत आहे. यावर्षी जास्त पाऊस पडेल असे वाटते. त्यादृष्टिने चांगली साफसफाई चालू आहे. आपले अधिकारीही सक्षम आहेत. चांगल्यापध्दतीने काम चालू आहे. पाहणी दौ-यात आपल्याला दिसून येईल. प्रामुख्याने नालेसफाई व आपातकालीन कक्षाबाबत जास्त लक्ष देण्यात यावे. आपतकालीन कक्षाबाबत सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. कर्मचारी वेळेवर हजर राहतील याबाबत अधिका-यांनी दक्षता घ्यावी. रात्रौ केव्हाही अडचण आली तरी मला कळवा. मी जरुर त्याठिकाणी येईल. सर्वांनी सतर्क राहिले पाहिजे. प्रत्येक प्रभाग निहाय पाहणी करायची आहे. येऊरकडून येणा-या नाल्याला जास्त पाण्याचा प्रवाह असतो.

आजच्या या बैठकीला सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी उपस्थित राहिलेत. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. नवनिर्वाचित सदस्य श्री. सुरेश भोईर हे उपस्थित झाले त्यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. आपल्या समितीच्या बैठकीमध्ये कोणताही भेदभाव केला जात नाही. आपण सर्व एक कुटुंब समजून याठिकाणी जमतो. चर्चा करतो. विविध कामांबाबत सुचना केल्या जातात. मी जेव्हा नव्याने निवडून आलो व नगरसेवक झालो तेव्हा मा. महासभेत ग्लॅक्सो कंपनीच्या रस्त्यासंदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी मा. आ. व ठाणे जिल्हाप्रमुख श्री. एकनाथजी शिंदे साहेब सभापती होते. त्यांनी मी उपस्थित केलेला मुद्दा व तो ज्या पध्दतीने उपस्थित केला त्याचा त्यांचेवर एवढा प्रभाव पडला की, त्यांनी माझे नांव विचारुन मला बोलवून घेवून माझे कौतुक केले होते. आज त्यांच्याच आशिर्वादाने मी याठिकाणी दुस-यांदा सभापती पदी विराजमान आहे. त्यांचा मी सदैव आदर करतो.

माझ्या प्रभागात एका विकासकाने ॲमॉनिटी प्लॉट विकसित करुन त्याठिकाणी पार्किंग झोन उभे केले आहे. महापालिकेला खर्चात न टाकता त्या विकासकाकडून तो तयार करुन घेतला आहे. काही दिवसांतच त्याचे उद्‌घाटन होणार आहे. त्याठिकाणीही आपल्याला भेट द्यायची आहे. इतरही सन्मा. सदस्यांच्या प्रभागामध्ये अशाप्रकारचे प्लॉट असतील तर त्यांनी ते विकसित करणेबाबत सुचना कराव्यात. याबाबत आवश्यक ते मार्गदर्शन केले जाईल.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने मी दुस-यांदा याठिकाणी सभापती झालो आहे. ज्या विश्वासाने नागरीकांनी आपल्याला निवडून दिले आहे. त्यांच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देऊ नका याबाबत दक्षता घ्या. अशी मी आपणा सर्वांना विनंती करतो.

**सदर सभेत खालील विषयांना मंजुरी देण्यात आली :-**

**प्रकरण क्रमांक:- ०९ विषय** :- ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची अध्यक्ष निवडीची सभा क्र. ०१ दिनांक दिनांक ०३/०४/२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक ०९ दिनांक ०५/०६/२०१०

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची अध्यक्ष निवडीची सभा क्र. ०१ दिनांक ०३/०४/२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त सन्मा. सदस्यांच्या सुचनेसह ही समिती वाचून कायम करीत आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. दशरथ बाबुराव पालांडे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**प्रकरण क्रमांक:- १० विषय** :- ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा क्र. ०२ दिनांक २१/०४/२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक १० दिनांक ०५/०६/२०१०

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा क्र. ०२ दिनांक २१/०४/२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त सन्मा. सदस्यांच्या सुचनेसह ही समिती वाचून कायम करीत आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. दशरथ बाबुराव पालांडे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- ११ विषय** :-प्रभाग क्र. १८ मधील भिमनगर भरत काटेवाला ते एन. डी. खरात घरापर्यंत २ इंची जी. आय. जलवाहिनी नगरसेवक निधीतून अंथरणेबाबत.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक ११ दिनांक ०५/०६/२०१०

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. १८ मधील भिमनगर भरत काटेवाला ते एन. डी. खरात यांचे घरापर्यंत २ इंची जी. आय. जलवाहिनी नगरसेवक निधीतून अंथरणेबाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,१५,९३०/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पंधरा हजार नऊशे तीस मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,१५,९३०/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पंधरा हजार नऊशे तीस मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :- सौ. वनिताताई गंगाराम इंदिसे** **अनुमोदक :- सौ. अनिता अशोक सावंत**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**(तद्नंतर मा. सभापती महोदय दुपारी १.३५ वा. सभा संपल्याचे जाहिर करतात.)**

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
सभा संपल्याची वेळ दुपारी १.३५ वा.
दिनांक ०५/०६/२०१०

सही/-

**प्रभाग अधिकारी**

वर्तकनगर प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.